दिनांक 27/10/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं. 158

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील विविध ठिकाणी सिमेंट बेंचेस खरेदी करणे व जागेवर कॉंक्रिटमध्ये बसवून देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी इंजिनियर यांची दिनांक 25/10/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद हद्दीतील विविध भागामध्ये तसेच विविध भागातील नगरपरिषदेच्या बगीचामध्ये तसेच विटा नगरपरिषद हद्दीतील मंदिरामध्ये तसेच रस्त्याच्या कडेस सिमेंट बेंचेस बसविणेबाबत नागरीकांची मागणी होत आहे. तरी सिमेंट बेंचेस खरेदी करुण जागेवर कॉंक्रिटमध्ये बसविणेकामी प्रशासकीय ठराव करणे आवश्यक आहे. सन 2023-24 च्या वार्षिक अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये 10.00 लक्ष इतकी तरतूद करणेत आलेली आहे. तरी विटा नगरपरिषद हद्दीतील विविध ठिकाणी सिमेंट बेंचेस खरेदी करणे व जागेवर कॉंक्रिटमध्ये बसवून देणेकामी कोटेशन मागविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 27/10/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.159

विषय - विटा शहरात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) 2.0 अंतर्गत आकांक्षी स्वच्छतागृह(Aspirational Toilet) बांधणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – 1) मा.मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 27/10/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.स्वमअ-2022/प्र.क्र.73/नवि 34, दि.15/07/2022

3) मा.राज्य अभियान संचालक, स्वच्छ महारष्ट्र अभियान(ना) यांचे पत्र क्र.राअस/आकांक्षी/12/23-24 दिनांक 6/4/2023रोजीचे पत्र.

4) आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी यांचा structural audit report क्रमांक AITRC/OL/22- 23/1020 दिनांक 06/07/2023 रोजीचा रिपोर्ट.

5) मा.कार्यकारी अभियंता (प्र), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,सांगली यांचे पत्र जा.क्र.तांशा- 1/तां.मा./विटा न.प./1447/2023, दि.14/07/2023.

6) दि.11/07/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.34.

7) दि.07/07/2023 रोजी महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय,स्वच्छ महाराष्ट्र अभियान(नागरी),मुंबई येथे झालेल्या बैठकीत दिलेले निर्देश.

विटा नगरपरिषदेची 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 48289 असून सध्याची लोकसंख्या अंदाजे 55,000 इतकी आहे. शहराचे एकूण क्षेत्रफळ 55.15 चौ.कि.मी इतके मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आहे. शहराचा विस्तार पाहता नागरीकांची मोठ्या प्रमाणात वास्तव्य वाढत आहे. तसेच शहराच्या विस्तार वाढीमुळे आरोग्य सुविधा वाढविणे, त्याची सुधारणा करणे गरजेचे आहे. स्वच्छ भारत अभियानात विटा नगरपरिषदेने उत्तम कामगीरी देखील केली आहे. सबब शहरातील आरोग्य विषयक सुविधांचे अपग्रेडेशन करणे गरजेचे आहे.

संदर्भ क्रं.2 नुसार केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान 2.0 धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी सुरु झाली आहे. याअनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र.3 नुसार पर्यटन, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या शहरामध्ये आकांक्षी (Aspirational) स्वच्छतागृहे बांधणे बाबत निर्देश देणेत आले आहेत. तसेच दिनांक 5 ऑक्टोबर 2023 रोजी प्राप्त संदेशानुसार इतर शहरांना जर आकांक्षी (Aspirational) स्वच्छतागृहे बांधणे इच्छित असतील तर त्यांनी सदर प्रस्ताव शासनास सादर करणे बाबत निर्देश देणेत आले आहेत.यानुसार शहरात येणा-या नागरिकांना सार्वजनिक शौचालय उपलब्ध करून देणे क्रमप्राप्त आहे.

पान नं.2 वर

सद्यस्थितीत शहरात 18 ठिकाणी सार्वजनिक शौचालय उपलब्ध आहेत.त्यापैकी एक महात्मा गांधी शाळेजवळील शौचालय हे 1980 च्या दरम्यान बांधण्यात आले आहे. सदर ठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असून शौचालय सुस्थितीत नसल्या कारणाने तेथील नागरिक / विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्यामुळे सदरचे शौचालयाचे काम तात्काळ करणेबाबत तेथील नागरिकांची वारंवार मागणी होत आहे.

संदर्भ क्रं.4 नुसार आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी यांचेकडील structural audit report मध्ये सदरचे शौचालय पाडणेबाबत शेरा नमूद आहे. यानुसार नागरिकांना चांगल्या दर्जाचे सार्वजनिक शौचालय उपलब्ध करून देणेसाठी सदरचे शौचालय पाडून त्याजागी आधुनिक सर्व सोयीयुक्त शौचालय बांधणे संयुक्तिक वाटते.

स्वच्छ भारत अभियान 2.0 अंतर्गत आकांक्षी शौचालय निधीतून वरील ठिकाणी स्वच्छतागृहे बांधलेस नागरिकांची दृष्टीने सोयीचे होईल, तसेच सदरील जागा ही विटा नगरपरिषदेच्या मालकीची असल्याने नगरपरिषदेस या ठिकाणी प्राप्त निधीतून तात्काळ काम करणे शक्य होईल.

संदर्भ क्रं.5 नुसार सदर कामाचे र.रु.32,89,222/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,सांगली यांचे कडून तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे.

संदर्भ क्रं.6 नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) अंतर्गत सामुदायिक शौचालय (CT) अखर्चित निधीमधून सदर जुने सामुदायिक शौचालय (CT) पाडून त्या ठिकाणी नवीन सामुदायिक शौचालय बांधणेबाबत प्रशासकीय ठराव करण्यात आला होता. परंतु संदर्भ क्रं.7 नुसार झालेल्या बैठकीत सदर प्रस्ताव स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 अंतर्गत सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.त्यामुळे सदर प्रस्ताव पाठविणेत आला नाही. तसेच संदर्भ क्र.3 नुसार पर्यटन, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या शहरामध्ये आकांक्षी (Aspirational) स्वच्छतागृहे बांधणे बाबत निर्देश देणेत आले आहेत. तसेच दिनांक 5 ऑक्टोबर 2023 रोजी प्राप्त संदेशानुसार इतर शहरांना जर आकांक्षी (Aspirational) स्वच्छतागृहे बांधणे इच्छित असतील तर त्यांनी सदर प्रस्ताव शासनास सादर करणे बाबत निर्देश देणेत आले आहेत.

त्यामुळे संदर्भ क्रं.6 अन्वये करण्यात आलेला ठराव रद्द करून त्या ऐवजी सदर जुने सामुदायीक शौचालाय पाडून त्याठिकाणी नवीन सामुदायीक शौचालाय हे स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना) 2.0 अंतर्गत आकांक्षी (Aspirational) स्वच्छतागृह म्हणून विकसित करणेकामी मा.संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.) यांचेकडे निधी मागणीकरिता प्रस्ताव सादर करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा